प्राधिकरणातील अधिकारी आणि कर्मचारी यांचे
कार्यमुल्यमापन अहवाल लिहण्याबाबतची कार्यवाही

परिपत्रक-

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू.), मुंबई- ५१
जा.क्र: प्राधि/गो.अ./२०२३/ 638 /प्र:१० दिनांक 23 FEB 2023

---

संदर्भ:- १) सामान्य प्रशासन विभाग,महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र.सीएफआर-१२२०/प्र.क्र.११९/ का.१३ दि.१७/११/२०२२
२) या कार्यालयाचे पत्र क्र.प्राधि/गो.अ./२०२२/५९२४/प्र.१० दि.३०/११/२०२२
३) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-१०१३/प्र.क्र.५५/कोषा प्र-५ दि.०९/०७/२०१३

---

सामान्य प्रशासन विभाग,महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सीएफआर-१२२०/प्र.क्र.११९/ का.१३ दि.१७/११/२०२२ अन्वये राज्य शासकीय सेवेतील अधिकारी आणि कर्मचारी कार्यमुल्यमापन अहवाल दि.३१ डिसेंबर पर्यंत पूर्ण करणेबाबत सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर शासन परिपत्रक विभागीय मंडळाना कार्यवाहीकरिता पाठविण्यात आलेले आहे.

शासनाने कार्यमुल्यमापन अहवाल लिहण्याबाबतचे वेळापत्रक संदर्भाधिन शासन निर्णयान्वये निश्चित केलेले आहे.तथापि त्यानुसार कार्यमुल्यमापन अहवालावर विहीत मुदतीत कार्यवाही होत नाही असे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे,त्यामुळे परिविक्षा कालावधी पूर्ण करणे,पदोन्नती,आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देणे,इ.बाबी वेळेवर करणे शक्य होत नाही. यास्तव कार्यमुल्यमापन अहवाल लिहण्याची कार्यवाही विहीत वेळेत पूर्ण करण्याबाबत या परित्रकान्वये पुन:श्च सूचना देण्यात येत आहेत.

सन २०२१-२२ व त्या पूर्वीचे अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहावयाचे शिल्लक असल्यास प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिकारी यांचेकडून त्वरीत लिहून घेण्याची कार्यवाही करावी, अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांवर उपरोक्त संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी.

आपल्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालाचा मागील ७ वर्षाचा आंढावा घेऊन त्याबाबतचा तपशिल व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत प्राधिकरणास सादर करावा.

सदर परिपत्रकाची काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यात यावी.

(राजकुमार सागर)
सचिव/प्राधिकरण

**प्रत**
१) मा.मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी /प्रा.
२) मा.मुख्य अधिकारी/मुं.गृ.व क्षे.वि.मं./मुं.इ.दु.व पु.मं.
३) मुख्य अभियंता /१, २ व ३ /प्रा.
४) वित्त नियंत्रक /प्रा.
५) विधी सल्लागार /प्रा.
६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी /प्रा.
७) मुख्य. वास्तुशास्त्रज्ञ /प्रा.
८) मुख्य अधिकारी मुं.झो.सु.मं./कोंकण/पुणे/अमरावती/नाशिक/नागपूर/औरंगाबाद मंडळ.
९) चौकशी अधिकारी /प्रा.
१०) सक्षम प्राधिकारी (१) व (२) /प्रा.
११) मुख्य जनसंपर्क अधिकारी /प्रा.

**प्रत**-प्रशासकीय अधिकारी/मुं.गृ.व क्षे.वि.मं./मुं.इ.दु.व पु.मं./ मुं.झो.सु.मं./कोंकण/पुणे/अमरावती/नाशिक/नागपूर /औरंगाबाद मंडळ

**प्रत**-प्रशासन ११/१४/१४-ड/प्रा.